यवतमाळ दि. रविवार १ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से.°	२४ से.°

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक लोकसूत्र

● वर्ष - पाचवे ● अंक १७२ ● किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित



श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग

प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ

G.N.M. (3 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य

A.N.M.(2 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता

P.B. BSC NURSING
पात्रता : GNM

B.Sc. Nursing
4 वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40

ANM/GNM/B.Sc.(N)
शासन निर्णयानुसार



अधिक महितीकरीता संपर्क
टिप : शासकीय नियमानुसार सर्व्हेलन्सिप लागू ANM, GNM व BASIC B.Sc. (नर्सिंग) करिता
9561537762, 9130645861

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime



अन् चक्क दुकानच दिले पेटवून

यवतमाळ : आरोपीने फिर्यादी इसमाचे चक्क किराणा दुकान पेटवून दिले. यात दीड लाखांचे नुकसान झाले. ही घटना २८ ऑक्टोबरला पहाटे ४ वाजतापूर्वी उमरखेड तालुक्यातील मार्लेगाव येथील आंबेडकर वार्डातील बौद्ध विहाराच्या बाजुला घडली.

नामदेव उत्तम भगत (४९) रा. मार्लेगाव, ता. उमरखेड असे फिर्यादीचे नाव आहे. तर धम्मपाल सुदाम पाईकराव (३९) रा. मार्लेगाव असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. फिर्यादीचे बौद्ध विहाराला लागून किराणा दुकान आहे. आरोपीने हे दुकान पेटवून दिल्याचा तक्रारकर्त्याचा आक्षेप आहे. यामध्ये किराणा दुकानातील अंदाजे एक लाखांचे साहित्य व फर्निचर ज्यामध्ये खुर्ची, फॅन, फ्रीज इत्यादी व अन्य सहित्य उधार वहीखाते, दुकानाचे लायसन्स व कागदपत्रे असे दीड लाखांचे नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

सोयाबीनचे १० कट्टे चोरी

यवतमाळ : फिर्यादी शेतकऱ्याच्या घरापासून २०० मीटर अंतर असलेल्या गोदामाचे कुलूप तोडून कुण्यातरी चोरट्याने सोयाबीनचे ४०० ते ५०० किलो वजनाचे १० कट्टे किंमत २५ ते ३० हजार चोरून नेले. ही घटना २९ ऑक्टोबरच्या सायंकाळी ४ ते ३० ऑक्टोबरच्या सकाळी १० वाजताच्या सुमारास पुसद तालुक्यातील लाखी येथे घडली. संजय किसन चव्हाण (५०) रा. लाखी असे फिर्यादीचे नाव आहे. या प्रकरणी पुसद ग्रामीण पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

पाच वर्षांच्या सरासरी तुलनेतील वास्तव, –१.१५ मीटरने पातळी खालावली, ४२४ गावे प्रभावीत ; भूजल सर्वेक्षणचा अहवाल

जिल्ह्याच्या भूजल पातळीत ऐतिहासिक घट

केशव सवळकर

यवतमाळ : अल-निनोच्या प्रभावाने यंदा वार्षिक सरासरी ७९८.३२ मिमीच्या तुलनेत केवळ ६४४.९१ मिमी पाऊस झाला. ८०.७८ टक्के पाऊस झाला असल्याने जिल्ह्यावर दुष्काळाचे ढग दाटले. भुजल सर्वेक्षण विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणातून गंभीर वास्तव पुढे आले आहे. गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत भुजल पातळीत ऐतिहासिक घट नोंदविली आहे. ऋण १.१५ मीटरने भुजल पातळी खालावली आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ दरम्यान पाणीटंचाईने तब्बल ४२४ गावे प्रभावीत होतील असा इशाराही भुवैज्ञानिकांनी दिला आहे.



महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम २५ नुसार वर्ष २०२६-२७ करीता पावसाचे प्रमाण, स्वरुप व पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीची माहिती किंवा अन्य कोणत्याही संबंधित बाबी लक्षात घेऊन एका जलवर्षापेक्षा अधिक नसलेल्या कालावधीकरिता पाणीटंचाई क्षेत्र घोषित करण्यासाठीचा अहवाल भुवैज्ञानिकांनी बनविलेला आहे. शासनाच्या * पान ४ वर

जिल्ह्याची भूशास्त्रीय अन् नदीप्रणाली रचना

भुजल सर्वेक्षण विभागाने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याची भुशास्त्रीय व नदीप्रणाली रचना मांडली. त्यात मुख्य वर्धा नदी इशान्य सिमेवरून तर पैनगंगा दक्षिण सिमेवरून वाहते. प्रमुख आठ उपनद्या ज्यामध्ये वर्धेच्या बेंबळा, निर्गुडा तर पैनगंगेच्या उपनद्यात पूस, अरुणावती, अडाण, वाघाडी, खुनी आणि विदर्भा नदीचा समावेश आहे. खडकरचना व प्रवाह बघितला तर मुख्य रचनेमध्ये दख्खनचे पठार हा बेसॉल्ट खडक आहे. भुगर्भात इतर खडकांमध्ये आर्कियन्स, विंध्यन्स व गोंडवाना खडक आहे. प्रवाह प्रकारामध्ये डेंड्रिटिक (वृक्षकार) नाले जाळी पद्धतीची आहे.

या तालुक्यात सर्वाधिक घट

जिल्ह्यातील महागाव तालुक्यात –२.४७ मीटरने घट झाली. स्थिर भुजल पातळी ६.०६ मीटर आहे. बाभूळगाव तालुक्यात –२.२४ मीटर घट असून स्थिर भुजल पातळी ४.६२ मीटर आहे. यवतमाळ तालुक्यात –१.७४ मीटर घट असून स्थिर भुजल पातळी ४.२८ मीटर आहे. उमरखेड तालुक्यात –१.४५ मीटर घट असून स्थिर भुजल पातळी ३.८६ मीटर आहे. तर केळापूर तालुक्यात –१.३८ मीटर घट स्थिर भुजल पातळी ३.७१ मीटर आहे.

पाच वर्षांतील आकडेवारी (मीटरमध्ये)

तालुका	पाच वर्ष सरासरी	सप्टेंबर २०२६	फरक (घट)
महागाव	३.५९	६.०६	–२.४७
बाभूळगाव	२.३८	४.६२	–२.२४
यवतमाळ	२.५४	४.२८	–१.७४
उमरखेड	२.४१	३.८६	–१.४५
केळापूर	२.३३	३.७१	–१.३८
कळंब	२.९२	४.२०	–१.२८
वणी	३.४८	४.७६	–१.२८
दारव्हा	२.७५	३.८९	–१.१४
घाटंजी	२.७०	३.६९	–०.९९
राळेगाव	२.५०	३.४८	–०.९८
झरी	१.२४	२.११	–०.८७
पुसद	१.८९	२.७५	–०.८६
आर्णी	२.४२	३.०३	–०.६१
नेर	२.१३	२.६५	–०.५२
दिग्रस	३.१३	३.५०	–०.३७
मारेगाव	४.१७	४.३९	–०.२२

१७६ विहिरींचे निरीक्षण

भूजल सर्वेक्षण विभागाने जिल्ह्यातील १६ तालुक्यातील १७६ निरीक्षण विहिरी तपासल्या. प्रामुख्याने २०२१ ते २०२५ या पाच वर्षांचा तुलनात्मक कालावधी भूजल पातळीसाठी लक्षात घेण्यात आल्या. त्यामध्ये १६ ही तालुक्यामधील लघु पाणलोट क्षेत्रातील भुजल पातळीत सरासरी १.१५ मीटरने घट झाली आहे.

कारवाईवरच संशयाचे सावट, लॉज भाडेतत्त्वावर देणाऱ्या मालकाची जबाबदारी काय ?

महागावच्या लॉजवर डीवायएसपीच्या पथकाची धाड

दोघांना वेटर दाखविल्याची चर्चा, कारवाईत वेळकाढूपणा झाल्याचा आरोप



लोकसूत्र प्रतिनिधी

महागाव : शहरातील लॉजच्या नावाखाली कथितरीत्या सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायाचा मुद्दा आता चांगलाच ऐरणीवर आला आहे. काही दिवसांपूर्वी 'सुकन्या' लॉजवर पोलिसांनी धाड टाकल्यानंतर शनिवारी ३१ ऑक्टोबर दुपारी २ वाजताच्या सुमारास नागपूरतुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल पीआर–०७ येथे पोलिसांच्या विशेष पथकाने छापा टाकला. या कारवाईत एक महिला आणि दोन पुरुष आढळून आल्याची माहिती समोर आली आहे.

संतोष (३९) आणि नारायण (३७) या नावाच्या दोघांना आरोपी म्हणून दाखविण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या कारवाईनंतर काही गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, कारवाईच्या पद्धतीवरच संशयाचे सावट निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हॉटेल पीआर–०७ हे एका राजकीय व्यक्तीच्या मालकीचे आहे. त्यांनी मागील महिन्यात आपल्या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीकडे हॉटेल व लॉज भाडेतत्त्वावर दिल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर या ठिकाणी कथितरीत्या कुंटणखाना चालविला जात असल्याचा आरोप पुढे आला आहे. त्यामुळे * पान ४ वर

विधिमंडळातही गाजला होता मुद्दा

मध्यंतरी भाजपचे आ. सुधिर मुनगंटीवार यांनी आयो हॉटेल्स संस्कृतीच्या कार्यपद्धतीवर पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला होता. निर्जन ठिकाणी किंवा शहरापासून दूर असलेल्या अशा हॉटेल्समध्ये नेमके चालते काय, असा सवाल त्यांनी केला होता. ही हॉटेल्स सुरू करताना स्थानिक स्वराज्यसंस्थांची अधिकृत परवानगी घेतली जात नसल्याचेही त्यांनी म्हटले होते हे विशेष. त्यानंतर नागपूर– बोरी–तुळजापूर मार्गावर अशा संस्कृतीचा अर्थातच देहविक्रयाचा प्रकार चालत असावा, अशा वावड्या उठल्या. दै. लोकसूत्रने त्यावर सर्वप्रथम वृत्त प्रकाशित केले होते. त्यानंतर लोणबेहळनजिकच्या हॉटेलवरही कारवाई झाली होती हे विशेष.

कथित व्यवसायाचा सूत्रधार कोण ?

या कारवाईतील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे आरोपी म्हणून दाखविण्यात आलेल्या दोन्ही व्यक्तींना हॉटेलमधील वेटर म्हणून दाखविल्याची माहिती आहे. जर या लॉजमध्ये अवैध देहव्यवसाय सुरू असल्याचा संशय होता, तर त्यामागील सूत्रधार कोण, हॉटेल भाड्याने देण्यामागील अटी काय होत्या आणि मालकाला या कथित प्रकाराची माहिती होती का, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

कारवाईवर शंकाकुशंकांचे उधाण

मुख्य ग्राहक तसेच कथित देहव्यवसायात सहभागी असलेल्या अन्य महिलांना कारवाईतून वगळल्याची चर्चाही शहरात रंगली आहे. मात्र, या बाबींची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही.कारवाई झाली; पण मुख्य सूत्रधार मोकाट राहणार का,असा सवाल उपस्थित होत आहे.



इसमास मारहाण

यवतमाळ : दोन अनोळखी इसमानी दारूच्या नशेत संगनमत करून विनाकारण फिर्यादीसोबत वाद घातला. हातातील कड्याने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले. ही घटना ३० ऑक्टोबरला रात्री ८.१० वाजता दिग्रस तालुक्यातील कळसा येथे घडली. आनंदा शामराव गव्हाणे (५२) रा. मांडवा असे फिर्यादीचे नाव आहे. तर २५ ते २६वर्ष वयोगटातील दोन अनोळखी इसम अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

कोनशिलेचेही केले अनावरण

भवनाला स्व. वसंतराव नाईकांचे नाव देण्याची घोषणा

माजी सरन्यायाधीशांच्या हस्ते पुसदमध्ये वकील भवनाचे भूमीपूजन



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : पुसद येथील जिल्हा सत्र न्यायालय परिसरातील प्रस्तावित वकील भवनाचे भूमीपूजन व कोनशिलेचे अनावरण भारताचे माजी सरन्यायाधीश भुषण गवई यांच्या हस्ते आज शनिवारी ३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले.

या समारंभाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. अनिल किलोर, न्या. वृषाली जोशी, न्या. प्रवीण पाटील, न्या. राज वाकोडे, पालकमंत्री ना. संजय राठोड, राज्यमंत्री ना. इंद्रनिल नाईक, प्रधान जिल्हा न्यायाधीश आनंद यावलकर, जिल्हा न्यायाधीश एस जे रामगडिया, नगराध्यक्ष मोहिनी नाईक, महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष जयंत जायभाये, उपाध्यक्ष रंजना भोसले, सदस्य ॲड आशिष देशमुख, वकील संघाचे अध्यक्ष ॲड भारत जाधव, वकील संघाचे पदाधिकारी, विधीज्ञ आदी मान्यवर उपस्थित होते.माजी सरन्यायाधीश न्या. भुषण गवई यांनी मनोगत व्यक्त करतांना पोहरादेवी येथील भेटी दरम्यान आलेले अनुभव विषद केले. तसेच संत सेवालाल * पान ४ वर

हा तर दुग्धषर्करा योग – पालकमंत्री

यावेळी पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, आजचा हा ऐतिहासिक क्षण आहे. प्रस्तावित वकील भवन हे न्यायव्यवस्थेला बळ देणार केंद्र ठरणार आहे. देशाचे चारही स्तंभ एका छताखाली असून हा दुग्धषर्करा योग असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रस्तावित वकील भवनासाठी निधीची कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

भवनासाठी निधी कमी पडणार नाही– ना. नाईक

सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना. इंद्रनिल नाईक म्हणाले की, न्यायव्यवस्थेचा सन्मान राखणे आपली जबाबदारी आहे. प्रस्तावित वकील भवनाच्या कामासाठी निधी कमी पडणार नाही. प्रस्तावित वकील भवनाला माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे नाव द्यावे असा ठराव झाला असून त्यानुसार नाव देण्यात यावे, अशी सूचना त्यांनी केली.

जिल्ह्याची सुधारित पैसेवारी अवघी ४४ टक्के, आता अंतिम पैसेवारीकडे नजर

२०५२ गावशिवारातील पीकस्थिती बिकट

केशव सवळकर

यवतमाळ : जिल्ह्यावर यंदा पुन्हा एकदा दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. महसूल विभागाने शुक्रवारी जाहीर केलेल्या सुधारित पीक पैसेवारीने या वास्तवावर अधिकृत शिक्कामोर्तब केले आहे. जिल्ह्याची सुधारित पैसेवारी ४४ टक्के आली असून, यामुळे जिल्ह्यातील तब्बल २ हजार ५२ गावांची आर्थिक आणि कृषी उत्पादनाची परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यंदाच्या पावसाने हुकवलेला व एल निनोचा बसलेला प्रभाव थेट शेतकऱ्यांच्या बांधावर आणि पिकांवर स्पष्टपणे दिसून येत आहे. सोयाबीनचा हंगाम आधीच मातीमोल झाला होता, आणि आता कपाशीचीही पार वाट लागल्याने बळीराजा संकटात सापडला आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये पिकांची स्थिती वाईट नोंदवली गेली असून, संपूर्ण जिल्ह्याची सरासरी पैसेवारी ४४ पैसे इतकी आली आहे.

यंदाच्या हंगामात सोयाबीनचे पीक आधीच हातचे गेले होते. त्यानंतर आता नजर पैसेवारीनंतर सुधारित पैसेवारी जाहीर झाली, तेव्हा कपाशी आणि तूर पिकाची उत्पादकता ढासळल्याचे उघड झाले. जिल्ह्याचे मुख्य पीक असलेल्या कपाशीला यंदा प्रचंड फटका बसला असून, पहिल्याच वेच्यात कपाशीची उलंगवाडी झाली आहे. कपाशीच्या उत्पादकतेवरच ग्रामीण भागातील बाजारपेठांची उलाढाल अवलंबून असते; मात्र यंदाच्या नीचांकी



उत्पादकतेमुळे व्यापारी आणि शेतकरी दोघेही आर्थिक विवंचनेत आहेत. तसेच, रब्बीच्या सिंचनासाठी प्रकल्पांत पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. यंदाची दिवाळीही शेतकऱ्यांची अग्नीपरीक्षा पाहणारी ठरणार आहे.

पैसेवारी कशी काढली जाते ?

पैसेवारी म्हणजे पिकांच्या उत्पादनाचे प्रमाण काढण्याची पद्धत होय. ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी येणे म्हणजे पिकांची स्थिती बिकट मानली जाते.गाव पातळीवरील नजरअंदाज पाहणी: शेतकरी, ग्रामस्तरीय कृषी सहायक, तलाठी आणि महसूल अधिकारी मिळून गावातील पिकांची पाहणी करतात. नजरअंदाज पाहणीतून जिरायत व बागायत क्षेत्राची नेमकी काय अवस्था आहे, याचा अंदाज घेतला जातो.

पैसेवारीचा इतिहास ?

खरिपातील पीक परिस्थितीचा अंदाज जाहीर करण्यासाठी महसूल विभागाकडून ही यंत्रणा राबवली जाते. ही पैसेवारी काढण्याची पद्धत ब्रिटिश काळापासून आधार म्हणून घेतली जात आहे. याच ऐतिहासिक आणि तांत्रिक आधारावर आजही जिल्ह्याच्या एकूण शेतीची आणि दुष्काळाची स्थिती ठरवली जाते.

पीक कापणी प्रयोग

केवळ नजरेने अंदाज बांधून चालत नाही, यासाठी प्रत्यक्ष शास्त्रीय प्रयोग केले जातात. महसूल व कृषी विभागामार्फत ठरवा शेतांमध्ये जाऊन प्रत्यक्ष ठराविक चौरस मीटर क्षेत्रामध्ये पिकाची कापणी केली जाते. त्यातून निघणाऱ्या दाण्यांचे किंवा उत्पादनाचे अचूक वजन केले जाते. या प्रयोगातून मिळालेली आकडेवारी आणि मागील वर्षांची सरासरी यांची तुलना करून त्या गावाची किंवा तालुक्याची नेमकी पैसेवारी किती येईल, याचा अंतिम हिशेब काढला जातो.यवतमाळ जिल्ह्यात यंदा ही पैसेवारी ४४ पैसे आल्याने, कागदोपत्री आणि प्रत्यक्ष पाहणीतून दुष्काळ स्पष्ट झाला असून, आता शासनाकडून तातडीच्या मदतीची प्रतीक्षा आहे.

तालुका	गावे	पैसेवारी
यवतमाळ	१३५	४३
कळंब	१४१	४४
बाभुळगाव	१३३	४२
आर्णी	१०६	४४
दारव्हा	१५०	४३
दिग्रस	८२	४४
नेर	१२१	४३
पुसद	१८७	४४
उमरखेड	१३६	४६
महागाव	११२	४६
केळापूर	१३०	४४
घाटंजी	१०७	४६
राळेगाव	१३२	४३
वणी	१५५	४५
मारेगाव	१०८	४४
झरी	११७	४३
एकूण	**२०५२**	**४४**

पैसेवारीचे टप्पे

शेतीची परिस्थिती समजून घेण्यासाठी तिन टप्प्यांत पैसेवारी काढली जाते. प्रथम नजर पैसेवारी: पिकांच्या प्राथमिक स्थितीचा अंदाज घेण्यासाठी.सुधारित पैसेवारी: पिकांची काढणी जवळ आल्यावर किंवा ऑक्टोबर महिन्यात केली जाणारी सुधारित पाहणी (जी नुकतीच जाहीर झाली आहे).अंतिम पैसेवारी: संपूर्ण हंगाम संपल्यानंतर अंतिम पैसेवारी जाहीर होते, ज्यातून दुष्काळ वा सवलतींवर शिक्कामोर्तब होते.

लोकशाहीचे स्वप्नरंजन

'न परिंदों का ठिकाना, न शजर बदला है,
वक्त की आंधी में सियासत का हुनर बदला है!
ख्वाब दिखलाकर जो पहुंचे थे
ऐवान-ए-बुलंद, पूछो उनसे,
गरीबों का किधर घर बदला है?'

शायर म्हणतोय, ना पाखरांचे ठिकाण बदलले, ना झाड बदलले, काळाच्या वादळात राजकारणाचा साचा बदलला आहे! सुंदर स्वप्ने दाखवून जे पोहोचले महलांच्या शिखरावर, त्यांना विचारा, गरीबांचे घर नेमके कुठे बदलले आहे? भारतीय लोकशाही सर्वांगसुंदर मानली जाते. प्रजा ही राजा आहे. मात्र, ही केवळ मतदानाच्या दिवसापुरती. राजकीय पक्षांचे उमेदवार या प्रजेला सुखाची सारी स्वप्ने दाखवितात. प्रत्यक्षात कालांतराने लोकप्रतिनिधी बनून ही मंडळी महलांच्या शिखरावर पोहोचते. मात्र गरीबांची घरे तशीच कुडामातीची उरतात.

आज आपण ज्या कालखंडात उभे आहोत, तिथे लोकशाहीचा केवळ सांगाडा उरला आहे आणि आत्मीयतेचा ओलावा कुठेतरी हरवून चालला आहे. कागदावर लिहिलेली संविधानाची पाने सुरक्षित आहेत, पण त्या पानांमागे दडलेला मानवी अधिकार, गरिबांच्या अश्रूंची किंमत आणि लोकशाहीची खरी पाळेमुळे आज हळूहळू सुकत चालली आहेत. जेव्हा आपण आरशात बघतो आणि स्वतःला विचारतो ''ही लोकशाही नेमकी कोणासाठी आहे?'' तेव्हा उत्तर मिळण्याऐवजी मनात एक पोकळी निर्माण होते. आजचा हा वैचारिक प्रवास केवळ राजकीय नाही, तर आपल्या प्रत्येकाच्या सदसद्विवेकबुद्धीला आणि संविधानाप्रती असलेल्या निष्ठेला जागृत करणारा एक गंभीर प्रश्न आहे.

'कसमें खाकर जो चले थे राह-ए-वफ़ा पर,
आज कुर्सी के इशारे पर हर कायदा झुक गया!
कलम रोती है फाइलों के अंधेरे कोनों में,
देख, नुमाइंदा आज मुकद्दर का सौदागर बन गया।'

लोकप्रतिनिधीच नव्हे तर स्पर्धा परीक्षा देऊन सनदी अधिकारी झालेले उच्चपदस्थ व्यक्तीमत्त्वसुद्धा राजकारण्यांपुढे किती लाचार झाले, याचा पदोपदी प्रत्यय येतो. ज्यांनी सेवेत येण्यापूर्वी निष्ठेच्या मार्गावर चालण्याची शपथ घेतली होती, मात्र तेच आज खुर्चीच्या इशाऱ्यावर नाचताना दिसत आहे! केवळ सत्ताधारी सांगतील त्या फाईली निकाली निघतात. उर्वरित मात्र कार्यालयातील कुठल्यातरी कोपऱ्यात पडलेल्या असतात. अब्राहम लिंकन यांनी सांगितलेली लोकशाहीची व्याख्या 'लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' आज केवळ पुस्तकी कागदोपत्री उरली आहे.

सत्तेसाठी सारं काही या विचाराने झपाटलेले राजकारणी जनतेला उत्तरदायी राहण्याऐवजी स्वतःची खुर्ची आणि साम्राज्य टिकवण्यात मग्न आहेत. लोककल्याणाचे निर्णय बाजूला सारून सूडाचे राजकारण, प्रशासनाचा वैयक्तिक स्वार्थासाठी वापर आणि कायदे पायदळी तुडवणे ही आजची नवी कार्यसंस्कृती झाली



का, असा संवेदनशील मनाला प्रश्न पडतो आहे. प्रशासकीय अधिकारी या नेत्यांच्या ताटाखालचे मांजर बनल्यासारखे काम करत आहेत. संविधानाने कलम ३११ अंतर्गत या अधिकाऱ्यांना भक्कम संरक्षण दिले होते, जेणेकरून त्यांनी कोणत्याही राजकीय दबावाला न जुमानता निष्पक्षपणे कायद्याचे राज्य चालवावे. परंतु, आजचे अधिकारी केवळ बदली आणि साईड-पोस्टिंगच्या भित्रेपणापोटी सत्ताधाऱ्यांच्या काही बेकायदेशीर इशाऱ्यावर सरपटत असल्याचे दृष्य आहे.

'कुर्सियों की हवस में ईमान बेच आए,
जो संविधान के रक्षक थे, वो दरबार के गुलाम बन गए!

जेव्हा एखादा प्रशासक नियमांचे पुस्तक बाजूला ठेवून मंत्र्यांच्या तोंडी आदेशांची अंमलबजावणी केली जाते, तेव्हा तो संविधानाच्या कलम ७५(३) आणि १६४ मधील लोकशाही उत्तरदायित्वाचा खून करत असतो. ज्येष्ठ पत्रकार रविशकुमार म्हणतात त्याप्रमाणे, आजचा प्रशासक 'होयबा' झाला आहे, कारण त्याला लोकसेवेपेक्षा स्वतःची मलाईदार पदे आणि निवृत्तीनंतरची सोय जास्त प्रिय आहे.

ग्रामीण भारताचे वास्तव मांडणारे पी. साईनाथ नेहमीच एका सत्याची जाणीव करून देतात. 'जेव्हा गरिबांचे हक्क चिरडले जातात, तेव्हा प्रशासन मूग गिळून बसते, कारण ते आज राजकीय स्वार्थाचे बाहुले बनले आहे. 'मंत्र्यांची खुर्ची येते आणि जाते, सरकारे बदलतात, पण प्रशासकीय संस्था आणि संविधान शाश्वत असते. मात्र, आज अनेक अधिकाऱ्यांना ही जाणीव उरल्याचे दिसत नाही. अपवाद तुकाराम मुंढेंसारखे अधिकारीच खऱ्या अर्थाने आपल्या पदाचा वापर करतात. केवळ अधिकारीच नव्हे तर ज्याला लोकशाहीचा चवथा स्तंभ म्हणून गौरविले जाते, ती पत्रकारिता आज सत्तेची 'बटीक' बनली आहे.

'जो कभी जुबां था इस अवाम की ताकत का,



केशव सवळकर
कार्यकारी संपादक, दै. लोकसूत्र
९६२३२०७३५५

काळोखाकडून प्रकाशाच्या दिशेने...
'अभी अंधेरा घना है तो क्या हुआ दोस्तों,
सुबह की किरण का इम्तिहान बाकी है!
उठो, खुद को पहचानो, ए अवाम के हामी,
अभी लोकतंत्र की जान बाकी है!'

आता अंधार दाट आहे तर काय झाले मित्रांनो, सकाळच्या किरणाची परीक्षा अजून बाकी आहे! उठा, स्वतःला ओळखा, हे जनतेच्या पाठीराख्यांनो, अजून लोकशाहीचा जीव शिल्लक आहे! घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत स्पष्ट चेतावणी दिली होती की, 'संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणारे लोक जर वाईट निघाले, तर ते संविधान शेवटी वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.' आज तीच काळाची वेस ओलांडून वेळ आली आहे. जर ही लोकशाही टिकवायची असेल, तर:प्रशासनाने सत्तेच्या ताटाखालचे मांजर होणे सोडून पुन्हा संविधानाचे पुस्तक हातात घेतले पाहिजे. पत्रकारांनी सत्तेचे बटिक होणे सोडले पाहिजे. पुन्हा एकदा धारदार प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवले पाहिजे. विरोधकांनी एसी केबिनमधून बाहेर पडून जनतेचे प्रश्न रस्त्यावर आणि सदनात आक्रमकपणे मांडले पाहिजेत. जनतेने आपली हतबलता आणि भीती झटकून, लोकशाहीचे खरे मालक आपणच आहोत याची जाणीव सत्ताधीशांना करून दिली पाहिजे.

आज वो कलम हुकूमत का गुलाम हो गया!
सच लिखते-लिखते जो थकते नहीं थे कभी,
आज हर एक आईना बिकाऊ गुलाम हो गया।'

जी लेखणी कधी या जनतेच्या शक्तीची बोली होती, आज तीच कलम सत्तेची गुलाम झाली आहे! सत्य लिहिता लिहिता जे कधी थकले नाहीत, आज जनतेचा हा आरसा गुलाम झाला तर नाही ना, अशी थट्टा उडविली जात आहे. पत्रकारितेचे मूळ कर्तव्य ''सत्तेला जाब विचारणे'' (speaking truth to power) हे होते. परंतु, कॉर्पोरेट जगताचा विळखा आणि सरकारी जाहिरातींच्या तुकड्यांवर जगणारे माध्यम समूह आज सरकारच्या निखळ प्रसिद्धी संस्था (PR-Agencies) बनले आहेत. आज देशात माध्यमांना 'गोदी मीडिया' म्हणून हिणविले जात असेल तर त्यावरही माध्यमातील वरीष्ठांनी, मालकांनी चिंतन करण्याची गरज आहे.

खरे तर आज बेरोजगारी, महागाई, गरिबी आणि शेतकरी आत्महत्येसारख्या ज्वलंत प्रश्नांवर जाब विचारण्याऐवजी, आम्ही पत्रकार २४ तास धार्मिक ध्रुवीकरण आणि सत्ताधाऱ्यांच्या स्तुतीपाठात धन्यता मानत आहोत का, हा प्रश्न अंतर्मनाला विचारण्याची गरज आहे. एकेकाळी दिवंगत ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांच्यासारखे दिग्गज पत्रकार सत्तेच्या विरोधात उभे राहून निर्भयपणे लिहीत असत. आणीबाणीच्या काळातील लाचारीवर भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी केलेले ऐतिहासिक वक्तव्य आजच्या काळाला तंतोतंत लागू पडते. ते म्हणाले होते, 'तुम्हाला फक्त वाकायला सांगितले होते, पण तुम्ही तर सरपटू लागलात!' आजचे अनेक पत्रकार तर सरपटण्याच्याही पलीकडे जाऊन सत्तेसमोर लोटांगण घालताना दिसत असल्याने लोकांमध्ये पत्रकारांबद्दलची विश्वासार्हता ढासळली आहे.

पत्रकारांनी हे ओळखले पाहिजे की, सत्तेची चाकरी करून काही काळ संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळवता येईल, पण इतिहासाच्या पानात त्यांची नोंद लोकशाहीचे मारेकरी म्हणून होईल.

केवळ पत्रकारिताच नव्हे तर सद्यस्थितीत लोकशाहीचे दुसरे चाक असलेले विरोधक दिशाहीन आणि सुस्त बनले आहेत. जनतेचे प्रश्न विसरलेले या संपूर्ण दुरावस्थेला जेवढे सत्ताधारी जबाबदार आहेत, तेवढेच आजचे दुबळे, आळशी आणि सुस्त विरोधकही जबाबदार आहेत. लोकशाहीत मजबूत विरोधी पक्ष हा व्यवस्थेचा खरा पहारेकरी असतो. परंतु, आजचे विरोधक जनतेचे प्रश्न आक्रमकपणे रस्त्यावर मांडण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. यवतमाळसारख्या जिल्ह्यात प्रश्नांची मालिका आहे. मात्र, दिल्लीतील नेते रस्त्यावर आंदोलन करत असताना जिल्ह्यात मात्र सत्ताधाऱ्यांविरुद्ध अभ्यासूपणे आंदोलन करणारा एकही नेता असू नये, हे दुर्दैव आहे. केवळ निवडणुका आल्यावर जागी होणारी, सोशल मीडियावर पोकळ निवेदने देणारी आणि प्रत्यक्ष जमिनीवर उतरून जनतेच्या सुख-दुःखात भागीदार न होणारी ही विरोधी मंडळी सत्तेशी जणू आतून साटंलोटं करून बसली आहेत का, असा सवाल आहे. अभ्यासूपणे शासनाच्या फसलेल्या योजनांवर भांडणारा नेता आज जिल्ह्यात नाही. यावरून हेच स्पष्ट होते की विरोधकही आपल्या मूळ कर्तव्यापासून फार दूर निघून गेले आहेत. विरोधकांची ही सुस्ती सत्ताधाऱ्यांना अधिक हुकूमशहा बनवण्यास खतपाणी घालत आहे.

खरे तर या सर्व बाबीला मतदार म्हणून तुम्ही आम्ही सर्व जबाबदार आहोत.


'फकत कागदों पर सजा ली है तकदीर हमने,
अपने ही हाथों से मिटा दी है तस्वीर हमने!
वो पूछते हैं, क्यों सहते हो जुल्म खामोश रहकर,
क्या कहें, खुद बेच डाली है जमीर हमने?'

फक्त कागदावरच आम्ही आमचे नशिब सजवून घेतले आहे. अन् स्वतःच्याच हाताने ते मिटवून टाकले आहे! असा अन्याय मुकपणे का सहन करता, असा प्रश्न जेव्हा होतो, तेव्हा आम्ही स्वतःच आमची स्वाभिमानी वृत्ती विकून टाकली, असे वाटते आहे. या संपूर्ण राजकारणाच्या खेळात सर्वात जास्त जर कोणी होरपळत असेल, तर ती आहे हतबल जनता. संविधानाने ज्यांना देशाचा मालक बनवले, तीच जनता आज स्वतःच्याच हक्कासाठी एका दारावरून दुसऱ्या दारावर भिकाऱ्यासारखी फिरत आहे. नोकरीसाठी वणवण भटकणारा तरुण, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आणि महागाईच्या आगीत होरपळणारी गृहिणी आज पूर्णपणे पिसली आहे. तिच्या वेदना बघायला ना प्रशासनाकडे वेळ आहे, ना पत्रकारांच्या कॅमेऱ्यात जागा आहे, ना नेत्यांच्या अजेंड्यावर स्थान आहे.

सत्यनिष्ठेतून समृद्धीकडे : भ्रष्टाचारमुक्त समाजाची गरज

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संपन्नतेइतकीच नैतिक संपन्नताही महत्त्वाची असते. एखाद्या देशाकडे आधुनिक तंत्रज्ञान, भक्कम पायाभूत सुविधा, उद्योगधंदे, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि कुशल मनुष्यबळ असले, तरी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा नसेल, प्रशासनात पारदर्शकता नसेल आणि निर्णयप्रक्रियेत न्याय्यतेचा अभाव असेल, तर त्या देशाची प्रगती सर्वसमावेशक होऊ शकत नाही. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून तो समाजातील विश्वास, समान संधी, न्याय आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारा गंभीर प्रश्न आहे. सार्वजनिक पदावरील व्यक्तीने आपल्या अधिकारांचा वापर वैयक्तिक लाभासाठी करणे, नागरिकांच्या हक्कांमध्ये अडथळे निर्माण करणे किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर करणे, यामुळे संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता कमी होते. म्हणूनच सत्यनिष्ठा, सचोटी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये केवळ शासनव्यवस्थेतच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर भारतात दरवर्षी साजरा केला जाणारा दक्षता जनजागृती सप्ताह विशेष महत्त्व प्राप्त करतो. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनाखाली २०२६ मध्ये हा सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत देशभर साजरा केला जात आहे. यंदाची संकल्पना 'सत्यनिष्ठेतून समृद्धी' अशी आहे. या संकल्पनेतून प्रामाणिक आचरण, नैतिक मूल्ये आणि पारदर्शक प्रशासन यांच्या आधारे देशाची शाश्वत समृद्धी साधण्याचा संदेश दिला आहे. हा सप्ताह केवळ सरकारी कार्यालयांमध्ये शपथ घेणे, व्याख्याने आयोजित करणे किंवा जनजागृतीचे फलक लावणे एवढ्यापुरता मर्यादित राहता कामा नये. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक घटकाने स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करून भ्रष्टाचाराला नकार देण्याची आणि प्रामाणिकपणाला स्वीकारण्याची ही संधी मानली पाहिजे. दक्षता जनजागृती सप्ताहाचा संबंध सार्वजनिक प्रशासनातील सचोटी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधाच्या प्रयत्नांशी आहे. केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना १९६४ मध्ये करण्यात आली. पुढे केंद्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ द्वारे आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये, विभागांमध्ये आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये दक्षता प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी आयोग मार्गदर्शन करतो. भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींची दखल घेणे, दक्षता यंत्रणांच्या कार्याला दिशा देणे, प्रतिबंधात्मक उपाय सुचविणे आणि सार्वजनिक सेवांमध्ये नैतिक आचरणाला प्रोत्साहन देणे ही त्याच्या कार्याची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनातील सचोटी आणि कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या आयोजनामागील व्यापक हेतू आहे.

भ्रष्टाचाराची व्याप्ती केवळ लाच घेणे किंवा देणे एवढी मर्यादित नाही. सार्वजनिक अधिकारांचा गैरवापर करून अनुचित लाभ मिळिवणे, सरकारी निधीचा अपहार करणे, निविदा प्रक्रियेत संगनमत करणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळिवणे, पात्र व्यक्तींना डावलून अपात्र व्यक्तींना लाभ देणे, पदाचा प्रभाव वापरून नियमबाह्य निर्णय घेणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचा वैयक्तिक कारणांसाठी वापर करणे, हीदेखील भ्रष्टाचाराची विविध रूपे आहेत. काही गैरप्रकार उघडपणे घडतात, तर काही प्रशासकीय प्रक्रियेतील गुंतागुंत, निर्णयांमधील पक्षपात आणि नियमांच्या संदिग्धतेमुळे घडतात. अनेकदा भ्रष्टाचाराला समाजातील काही घटकांकडून मूक संमती मिळते. 'काम लवकर व्हावे म्हणून पैसे द्यावे लागतात', 'ओळख असल्याशिवाय काम होत नाही' किंवा 'नियमांपेक्षा व्यवहार महत्त्वाचा' अशी मानसिकता भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. ही मानसिकता बदलल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती होणे कठीण आहे. भ्रष्टाचाराचे परिणाम सर्व समाजघटकांना जाणवतात; मात्र त्याचा सर्वाधिक फटका गरीब, वंचित, ग्रामीण आणि दुर्बल घटकांना बसतो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळिवण्यासाठी नागरिकांना अनावश्यक अडथळ्यांचा सामना करावा लागला, तर योजनांचा मूळ उद्देशच निष्फळ ठरतो. रेशन, घरकुल, शिष्यवृत्ती, रोजगार हमी, आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा आणि शैक्षणिक प्रवेश यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागणे, कागदपत्रांच्या नावाखाली अडवणूक होणे किंवा अनधिकृत पैसे मागितले जाणे ही गंभीर बाब आहे. ज्या व्यक्तीला शासनाकडून मदत मिळणे अपेक्षित आहे, तिलाच आपला हक्क मिळिवण्यासाठी अतिरिक्त आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असेल, तर ते सुशासनाचे लक्षण नाही. भ्रष्टाचारामुळे सार्वजनिक सेवांचा खर्च वाढतो, विकासकामांची गुणवत्ता कमी होते आणि समाजातील विषमता अधिक तीव्र होते. महाराष्ट्राच्या संदर्भात भ्रष्टाचारविरोधी जागरूकतेची गरज अधिक व्यापक आहे. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आणि सार्वजनिक संस्था नागरिकांना सेवा पुरवितात. ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंत पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सिंचन, घरकुल आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च होतो. या निधीचा योग्य वापर झाला, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. परंतु कामे कागदावर पूर्ण दाखविणे, निकृष्टदर्जाचे बांधकाम करणे, लाभार्थी निवडीत पक्षपात करणे किंवा मंजूर निधीचा गैरवापर करणे यामुळे विकासाच्या संधी हिरावल्या जातात. विशेषतः दुष्काळी आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठा, जलसंधारण, शेतीसंबंधित योजना आणि रोजगाराच्या



कामांमध्ये पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय म्हणजे नागरिकांच्या विकासाच्या हक्कावरच घाला होय. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा भ्रष्टाचार प्रतिबंधाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीची महत्त्वाची संस्था असून गावाच्या विकासाशी संबंधित निर्णयांमध्ये नागरिकांना सहभागी होण्याची संधी देते. ग्रामसभेत विकासकामांचे नियोजन, निधीचा वापर, लाभार्थी निवड, कामांची गुणवत्ता आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली पाहिजे. ग्रामपंचायतीने मंजूर कामांची माहिती, खर्चाचा तपशील आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. महिला बचतगट, युवक मंडळे, शेतकरी गट आणि सामाजिक संस्थांनीही सार्वजनिक कामांवर लक्ष ठेवावे. सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कागदोपत्री नोंदी यांची तुलना करता येते. लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या प्रश्नांकडे विरोध म्हणून न पाहता लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. दक्षता म्हणजे गैरव्यवहार घडल्यानंतर चौकशी करणे एवढेच नव्हे, तर गैरव्यवहार घडण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या त्रुटी आधीच दूर करणे होय. यालाच प्रतिबंधात्मक दक्षता म्हणतात. प्रशासनातील अनावश्यक प्रक्रिया, अस्पष्ट नियम, कामकाजातील विलंब, अधिकारांचा अवाजवी वापर आणि निर्णयप्रक्रियेतील अपारदर्शकता यांमुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते. नागरिकांना एखादे काम करण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, किती शुल्क भरावे लागेल, किती दिवसांत काम पूर्ण होईल आणि विलंब झाल्यास तक्रार कुठे करावी, याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. कार्यालयीन कामकाजात जबाबदारी निश्चित करणे, सेवा देण्यासाठी कालमर्यादा ठरविणे, तक्रारींचा नियमित आढावा घेणे आणि कामकाजाचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार होऊ नये अशी व्यवस्था निर्माण करणे हे भ्रष्टाचार झाल्यानंतर कारवाई करण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

यंदाच्या सप्ताहाच्या अनुषंगाने केंद्रीय दक्षता आयोगाने १७ ऑगस्ट ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तीन महिन्यांची प्रतिबंधात्मक दक्षता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत प्रलंबित तक्रारींचा निपटारा, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमता वृद्धी, डिजिटल उपक्रम आणि कंत्राट व्यवस्थापन या पाच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. क्षमता वृद्धीच्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान व सायबर सुरक्षितता, सार्वजनिक खरेदी, सरकारी ई-बाजारपेठेतील नव्या सुविधा, आचरणविषयक नियम आणि हितसंबंधांचा संघर्ष यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ तक्रारींची संख्या कमी करणे नसून दक्षता प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणे हा आहे. तक्रारींचा वेळेत निपटारा झाल्यास नागरिकांचा विश्वास वाढतो, तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्यास नियमबद्ध व जबाबदार निर्णयप्रक्रिया विकसित होते. माहिती तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचार प्रतिबंधासाठी अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. शासकीय सेवांचे संगणकीकरण, ऑनलाइन अर्जप्रक्रिया, ई-निविदा, डिजिटल देयके, थेट लाभ हस्तांतरण आणि ऑनलाइन तक्रार निवारण यांमुळे नागरिकांचा कार्यालयीन फेऱ्यांवरील अवलंब कमी होऊ शकतो. शासकीय खरेदीसाठी ई-खरेदी व्यवस्था आणि सरकारी ई-बाजारपेठ यांचा वापर केल्यास खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यास मदत होते. डिजिटल नोंदींमुळे व्यवहारांचा मागोवा घेता येतो आणि निर्णयप्रक्रियेतील अनियमितता शोधणे सोपे होते. तथापि, तंत्रज्ञान हा भ्रष्टाचाराचा आपोआप नाश करणारा उपाय नाही. डिजिटल व्यवस्थेतही बनावट नोंदी, संगनमत, माहितीचा गैरवापर आणि सायबर गुन्हे घडू शकतात. म्हणूनच माहितीची सुरक्षितता, नियमित तांत्रिक तपासणी, नागरिकांना डिजिटल साक्षरता आणि प्रणालींचे उत्तरदायित्व यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सार्वजनिक कंत्राटे आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे हेही दक्षता प्रशासनाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. रस्ते, पूल, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा योजना आणि इतर सार्वजनिक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. निविदेच्या अटी विशिष्टकंत्राटदाराच्या फायद्यासाठी तयार करणे, स्पर्धा मर्यादित करणे, संगनमताने दर निश्चित करणे, प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक खर्च दाखविणे किंवा निकृष्ट दर्जाचे काम स्वीकारणे यामुळे सार्वजनिक पैशाचे नुकसान होते. कंत्राट प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमबद्ध आणि तपासण्यायोग्य असला पाहिजे. कामाची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासली पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर कागदोपत्री प्रमाणपत्राबरोबरच प्रत्यक्ष पडताळणी झाली पाहिजे. कंत्राटदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक निधी हा जनतेच्या मालकीचा आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

भ्रष्टाचारविरोधी लढ्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरिकांसाठी प्रभावी साधन आहे. या कायद्यामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मागण्याचा अधिकार मिळाला आहे. शासकीय निर्णय, निधीचा वापर, विकासकामे, निविदा, लाभार्थी निवड आणि प्रशासकीय कार्यवाही यांसंबंधी माहिती मिळवून नागरिक व्यवस्थेचे परीक्षण करू शकतात. माहितीचा अधिकार हा केवळ कागदपत्रे मिळिवण्याचा मार्ग नसून प्रशासनाला उत्तरदायी बनविण्याचे लोकशाही साधन आहे. मात्र, प्रत्येक माहिती मिळिवण्यासाठी नागरिकांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये. शासकीय कार्यालयांनी महत्त्वाची माहिती नियमितपणे स्वतःहून प्रसिद्ध केली पाहिजे. निर्णयांची कारणे स्पष्ट असावीत आणि तक्रार निवारणाची व्यवस्था सहज उपलब्ध असावी. माहितीचा अधिकार वापरताना नागरिकांनी तथ्याधारित प्रश्न विचारणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणेही महत्त्वाचे आहे. भ्रष्टाचार उघड करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण करणे ही लोकशाही व्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वेळा गैरव्यवहाराची माहिती असलेल्या व्यक्तींना तक्रार केल्यास बदली, दबाव, छळ किंवा अन्य प्रतिकूल परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी भीती वाटते. त्यामुळे तक्रारदारांची ओळख आणि सुरक्षितता जपणे, तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे आणि सूडबुद्धीने होणाऱ्या कारवाईपासून संरक्षण देणे आवश्यक आहे. केंद्र शासनाशी संबंधित आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रकरणांसाठी आयोगाच्या निर्धारित प्रक्रियेचा उपयोग करता येतो. राज्य शासनाशी संबंधित प्रकरणांसाठी राज्यातील सक्षम दक्षता यंत्रणा किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करता येते. तक्रार करताना पुरावे, कागदपत्रे आणि घटनांचा तपशील अचूक देणे आवश्यक आहे. वैयक्तिक वैरातून केलेले आरोप किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित करणे टाळले पाहिजे. भ्रष्टाचार रोखण्याची जबाबदारी केवळ शासन आणि प्रशासनाची नाही. नागरिकांच्या दैनंदिन वर्तनातूनही प्रामाणिक सार्वजनिक संस्कृती निर्माण होते. स्वतःचे काम लवकर व्हावे म्हणून नियमबाह्य मार्ग स्वीकारणे, ओळखीचा वापर करून अनुचित लाभ मिळिवणे, पात्रता नसतानाही शासकीय योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणे किंवा लाच देऊन काम करून घेणे या कृती भ्रष्टव्यवस्थेला बळ देतात. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधात बोलताना स्वतःच्या वर्तनाचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. अधिकृत शुल्क भरणे, पावती घेणे, नियमांचे पालन करणे, चुकीच्या मागण्यांना नकार देणे आणि आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडे तक्रार करणे ही जबाबदार नागरिकांची कर्तव्ये आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, कर भरणे आणि सार्वजनिक नियमांचे पालन करणे यांमधूनही सामाजिक प्रामाणिकपणा व्यक्त होतो. शिक्षणसंस्था आणि युवकांची भूमिका भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीत अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, न्याय, समता, सार्वजनिक हित आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जाणीव करून दिली पाहिजे. निबंध, वक्तृत्व, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे भ्रष्टाचाराचे परिणाम समजावून सांगता येतात. परीक्षेत गैरप्रकार न करणे, संशोधनात साहित्यचौर्य टाळणे, शैक्षणिक कामात पारदर्शकता राखणे आणि संस्थात्मक नियमांचे पालन करणे यांपासून सचोटीची सुरुवात होते. युवक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची माहिती मिळवू शकतात, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारू शकतात आणि ऑनलाइन तक्रार यंत्रणांचा जबाबदारीने उपयोग करू शकतात. मात्र, समाजमाध्यमांवर अप्रमाणित आरोप किंवा चुकीची माहिती पसरविण्याऐवजी तथ्यांची पडताळणी करूनच जनजागृती करणे आवश्यक आहे.

महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही भ्रष्टाचारविरोधी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ग्रामीण भागातील महिला बचतगट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यासपीठ नसून सामाजिक जागरूकता आणि सामूहिक निर्णयक्षमतेचे माध्यम बनू शकतात. सार्वजनिक वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा, शाळांमधील सुविधा, आरोग्यसेवा आणि स्थानिक विकासकामांबाबत महिला संघटितपणे प्रश्न उपस्थित करू शकतात. स्वयंसेवी संस्थांनी नागरिकांना कायदेशीर अधिकारांची माहिती द्यावी, तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे आणि प्रशासनाशी रचनात्मक संवाद साधावा. भ्रष्टाचारविरोधी चळवळ ही केवळ दोष दाखविणारी न राहता चांगल्या प्रशासनासाठी लोकसहभाग वाढविणारी असली पाहिजे. भ्रष्टाचाराचे आर्थिक परिणामही दूरगामी असतात. सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्यास शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध असलेली साधने कमी पडतात. निकृष्टदर्जाची कामे झाल्यास त्यांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा सार्वजनिक पैसा खर्च करावा लागतो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात लाचलुचपत किंवा पक्षपात वाढल्यास प्रामाणिक उद्योजकांचा उत्साह कमी होतो आणि समान स्पर्ध

न्यायालयाच्या आदेशानंतरही एसटी कर्मचाऱ्यांचा कोविड भत्ता प्रलंबित

यवतमाळ : कोरोनाच्या अत्यंत कठीण आणि संकटमय काळात आपल्या प्राणाची परवा न करता अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यासमोर आजही अनेक प्रश्न उभे झाले आहेत. कोरोना कालावधीत उत्कृष्ट आणि महत्त्वाची सेवा देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचा विशेष कोविड प्रोत्साहन भत्ता अद्यापही प्रलंबित असल्याचा गंभीर प्रकार पुढे आला आहे. यासाठी राज्य परिवहन कर्मचारी संघटनेने आक्रमक भूमिका घेत कामगार आयुक्तांकडे निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल आयुक्तांनी घेतली असून महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटे दरम्यान जेव्हा रेल्वे सह सार्वजनिक वाहतुकीची बहुतांश सर्वच साधने पूर्णपणे बंद होती, तेव्हा अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी तसेच प्रवाशांच्या वाहतुकीची अत्यंत महत्त्वाची आणि मोठी जबाबदारी एसटी महामंडळावर सोपवण्यात आली होती. या जीवघेण्या परिस्थितीतही आपला जीव धोक्यात घालून अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिदिन तीनशे रुपये विशेष प्रोत्साहन भत्ता देण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय त्यावेळी घेण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर संबंधित कर्मचाऱ्यांना आजही या भत्काचा कोणताही आर्थिक लाभ मिळालेला नाही. अशी खंत संघटनेने व्यक्त केली. संघटनेच्या काही पदाधिकाऱ्यांनी मुंबई स्तरावर उच्च न्यायालयात कोविड भत्याबाबत स्पष्ट आदेश प्रशासनाला दिले होते. प्रशासनाने त्यावेळी होकार देऊन वेळ मारून नेली. मात्र आज सहा वर्षाचा कालावधी संपूनही एसटी कर्मचाऱ्यांना लाभ मिळालेला नाही. दरम्यान दिवाळीच्या पर्वावर तरी लाभ देण्यात यावा अशी मागणी संघटने कडून धार्मिक यांनी केली आहे.

कुत्र्याच्या नसबंदीत नगरपरिषद प्रशासन अपयशी

यवतमाळ : कुत्र्यांना न मारता त्यांच्यावर नसबंदीची शस्त्रक्रिया करून कुत्र्यांची संख्या नियंत्रित करावी अशी सूचना न्यायालयाने केल्यानंतर प्रशासनाने तशी मोहीम हाती घेतली होती. यासाठी शासनाने १६०० रुपयाची तरतूद करून दिली. दरम्यान सोळाशे रुपयांमध्ये कुत्र्याची नसबंदी करणे शक्य नसल्याने अनेकदा संबंधित ठेकेदाराने जेवढे काम होईल तेवढेच केले. त्यामुळे संख्या नियंत्रित झाली असली तरी प्रश्न गंभीरच आहे. राज्य शासनाने न्यायालयाच्या आदेशानंतर कुत्रे पकडण्याची मोहीम हाती घेतली होती. यासाठी निविदाही प्रकाशित केली. शासनाने केवळ एका कुत्र्याला नसबंदी करण्यासाठी केवळ सोळाशे रुपये निश्चित केले मात्र सोळाशे रुपयांमध्ये डॉक्टरांना पैसे देणे, कुत्र्यांना खाण्यापिणे देणे, हे न परवडण्यासारखे आहेत. यातही भटक्यां कुत्र्यांना पकडून विशिष्ट ठिकाणी तयार केलेल्या जागेवर न्यावे लागते. त्या ठिकाणी व्यवस्था करावी लागते. हे सर्व सोळाशे रुपयात करणे कठीण आहे. या संदर्भात ठेकेदाराला परवडेल अशा पद्धतीने निधीची तरतूद करावी यासाठी उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. त्यांच्यासोबत सविता चव्हाण, वनिता बडे, साधना भागारकर, लोकेश इंगोले, हे देखील होते. यावेळी मुख्याधिकारी यांनी शासनाला वाढीव रक्कम देण्यासंदर्भात पत्र देण्याचे निश्चित केले आहे. नगरपरिषदेच्या निधीतून काही तरतूद करता येते का? यावरही मुख्याधिकारी यांनी चर्चा केली असल्याची माहिती उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी दिली.

योगी श्रीअरविंद केंद्राच्या वतीने रविवारी यवतमाळात वक्तृत्व स्पर्धा

पुस्तक प्रदर्शनी व व्याख्यानाचे आयोजन

यवतमाळ : पूर्णयोगाचे प्रणेते, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील महान क्रांतिकारक योगी श्रीअरविंद यांच्या पंडिचेरी येथील आश्रमास शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तसेच वंदे मातरमब गीताच्या सार्धशती वर्षानिमित्त योगी श्रीअरविंद केंद्र यवतमाळ च्या वतीने रविवार, दिनांक १ नोव्हेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, श्री अरविंद यांच्या पुस्तकांची प्रदर्शनी आणि व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

दाते कॉलेजच्या सभागृहात १ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेचे विषय योगी श्रीअरविंद, श्री माताजी आणि वंदे मातरमब आहेत. वर्ग आठ ते बारा पैकी प्रत्येक शाळा- महाविद्यालयातून दोन विद्यार्थी कोणत्याही एका विषयावर तयारी करून या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके दिली जाणार आहेत. याच दिवशी याच ठिकाणी सकाळी आठ वाजल्यापासून स्व. सुरेश चोपडे यांच्या संग्रहातील श्री अरविंद यांच्या जीवन व कार्यावर आधारित पुस्तकांची प्रदर्शनी देखील आयोजित केली आहे. ती सर्वांकरिता खुली असून दिवसभर बघता येईल. संध्याकाळी ५ वाजता सुप्रसिद्ध वक्त्याडॉ. भारती सुदामे व उद्बोधक मनोहर ढोक, नागपूर हे श्रीअरविंदांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त करतील. या व्याख्यानास यवतमाळातील नागरिक बंधू भगिनींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन योगी श्री अरविंद केंद्र, यवतमाळच्या वतीने करण्यात आले आहे.

पुसद येथे ७ नोव्हेंबरला राज्यस्तरीय आंध आदिवासी उपवर-वधू परिचय मेळावा

पुसद : आदिवासी समाजातील विवाहयोग्य मुला-मुलींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, समाजातील विवाहविषयक अनावश्यक खर्चाला आळा बसावा आणि समाजात एकोपा व सामाजिक सलोखा वाढावा, या उद्देशाने आदिवासी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य (ट्रेड युनियन नोंदणी क्रमांक छत्रझ ५८८७), शाखा पुसद यांच्या वतीने राज्यस्तरीय आंध आदिवासी उपवर-वधू परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी पुसद येथील जिजामाता मंगलम, कारला रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मा. लक्ष्मण टारफे राहणार असून, उद्घाटक म्हणून सामाजिक न्याय विभागाचे सेवानिवृत्त उपायुक्त माधवराव वैद्य उपस्थित राहणार आहेत. तसेच माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून विवाहयोग्य मुला-मुलींची शैक्षणिक, कौटुंबिक व वैयक्तिक माहिती समाजबांधवांसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विवाह जुळिवताना होणारा अनावश्यक खर्च कमी करून आर्थिक बचत मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी उपयोगात आणावी, हा देखील या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. केवळ उपवर-वधू परिचय एवढ्यापुरता हा कार्यक्रम मर्यादित नसून, आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, कर्मचारी व अधिकारी बांधवांच्या समस्या, तसेच अडचणीत असलेल्या समाजबांधवांच्या कुटुंबांना सहकार्य करण्याबाबतही या मेळाव्यात सकारात्मक विचारविनिमय करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय मेळाव्यास महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून अंदाजे दोन हजार समाजबांधव उपस्थित राहण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. तरी महाराष्ट्रातील आंध आदिवासी समाजातील सर्व उपवर-वधू, पालक, अधिकारी, कर्मचारी आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन आदिवासी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, शाखा पुसद यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सामान्यांच्या हक्काच्या घराशी सरकारचा खेळखंडोबा!

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : गोरगरिबांच्या हक्काचे घरकूल स्वप्न पूर्ण करण्याचे दावे करणाऱ्या गरजूंना शासनाकडून मिळणारी रक्कम अति अल्प असल्याने चीड निर्माण झाली आहे.यामध्ये घर तर सोडा, साधे शौचालय, बाथरूमही व्यवस्थितपणे बांधले जात नाही. त्यामुळे राज्य शासनाने ज्या योजना कार्यान्वित केलेले आहे त्या योजनेमध्ये फेरविचार करून ही रक्कम वाढवून देण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणीच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घरकूलधारकांची आहे.

गोरगरिबांच्या हक्काचे घरकुल स्वप्न पूर्ण करण्याचे दावे करणाऱ्या शासनाने प्रत्यक्षात मात्र जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. शासना कडून सिंचन विहिरीसाठी असणाऱ्या योजनेत थेट पाच लाख रुपये, आणि सभागृहासाठी आठ लाख रुपये पर्यंतचा भरभक्कम निधी दिला जातो. मात्र गरिबाच्या हक्काच्या घरासाठी एक लाख वीस हजार, ते अडीच लाख पर्यंत भूखंड पाहून अनुदान दिल्या जाते. शासन असा दुजाभाव घरीच असल्याने गरजू मध्ये संताप व्यक्त केल्या जात आहे. महागाईच्या काळात अत्यंत अपुरे ठरणाऱ्या अनुदानामुळे लाभार्थी वर्गामध्ये तीव्र संताप उसळलेला दिसून येतो. शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास, यशवंतराव घरकुल योजना, आणि मोदी आवास योजना यासारख्या विविध योजनांच्या माध्यमातून घरकुले बांधली जातात. प्रत्यक्षात ही योजना फायद्याची ठरणे ऐवजी आर्थिक विवंचनेत लोटणारी ठरत आहे अशी

अनुदानाच्या तुटपुंज्या रकमेवर चीड

प्रतिक्रिया लाभधारकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

आजच्या महागाईच्या काळात सिमेंट, लोखंड, वाळू यासारख्या घर बांधकामाच्या साहित्याची दरवाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. यातही मजुरीचे दर प्रचंड वाढले आहे. सध्या बांधकाम करणाऱ्या गवंडी कामगाराचा रोज साडेसातशे ते हजार रुपये आहे. तर त्याला सहकार्य करणाऱ्या मजुराचा रोज सहाशे ते आठशे रुपये पर्यंत झाला आहे.



रोजाचा दर हा शहर आणि ग्रामीण भागातील निवासी मजुरांवर अवलंबून आहे. अशा महागड्या परिस्थितीत घर बांधायचे कसे असा प्रश्न लाभधारकांनी केला आहे. एकीकडे प्रशासकीय पातळीवर इतर कामांसाठी भरमसाठ निधीची उधळपट्टी सुरू आहे तर दुसरीकडे आयुष्यभर राबवून जमा केलेली पुंजी आणि प्रसंगी नातेवाईकाकडून घेतलेले कर्ज किंवा उसनवारी यावरच गरिबांना घर बांधण्याची वेळ आली आहे. प्रत्यक्ष ग्राउंडवर घरकुलाचा खर्च अडीच ते तीन लाखाच्या घरात जात असल्याने उरलेला पैसा आणायचा कुठून, असा जिव्हाळ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने निधी कपातीचा आणि अनुदानातील तफावतीचा विचार करून नव्याने अनुदानाची रक्कम पुनर्गठित करावी जेणेकरून लाभ धारकाला त्याचा पुरेपूर लाभ घेता येईल. शासनाचे अनुदानाचे हे धोरण पंधरा वर्षांपूर्वीची आहे. त्यावेळी असणारे बांधकाम साहित्याची दर, आणि आताचे दर यामध्ये चारपट फरक झालेला आहे. किंवा शासनाने अनुदानाची रक्कम देखील चार ते सहा पट पटीने वाढवून द्यावी अशी मागणी अपेक्षित घरकुलधारकांची केली आहे.


यवतमाळ नगरपरिषद क्षेत्रांतर्गत ज्या योजना कार्यान्वित करण्यात आले आहेत, त्याबाबतच्या फाइल्स नगर परिषदेकडे प्राप्त झाल्यानंतर एकाच वेळी आठ ते दहा फाइल्स काढून प्रशासकीय कारवाईसाठी पाठविल्या जातात. प्रशासकीय कार्यवाही काही दिवसात होते आणि लाभधारकाला अनुदानाची रक्कम तत्काळ दिल्या जाते. जी रक्कम शासनाने ठरवली त्यापेक्षा जास्त रक्कम देता येत नाही.

प्रीतम देशमुख, नगरपरिषद यवतमाळ.

अल्पवयीन मुलांचे आधार कार्ड २०२८ पर्यंत राहणार मोफत

लोकसूत्र प्रतिनिधी

अतिरिक्त पैसे मागणाऱ्यांवर होणार कारवाई



यवतमाळ : भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून आधार कार्ड सेवा बाबत नवीन आणि सुधारित दर लागू करण्यात आले आहेत. या सुधारित दरानुसार एक ऑक्टोंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २० २८ या कालावधीत अल्पवयीन मुलांच्या आधार कार्डची निर्मिती आणि काही ठराविक वयोगटातील अपडेट पूर्णपणे मोफत असणार आहेत. त्यामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी या शासकीय सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार योगेश देशमुख यांनी केले आहे.

सुधारित दर आणि मोफत सेवांची वैशिष्ट्ये सांगताना देशमुख म्हणाले, नवीन नियमानुसार झिरो ते पाच वर्ष वयोगटातील मुलांचे नवीन आधार कार्ड पूर्णपणे मोफत आहे. पाच वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील नवीन आधार नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र नोंदणी केंद्रांना प्रोत्साहन म्हणून १२५ रुपये आर्थिक सहाय्य दिले जाईल. तसेच पाच ते सात आणि पंधरा ते सतरा वयोगटातील मुलांचे बायोमेट्रिक अपडेट पूर्णपणे मोफत ठेवण्यात आले आहे. इतर नागरिकांसाठी बायोमेट्रिक अपडेट करिता १२५ रुपये आणि डेमोग्राफी अपडेट साठी ७५ रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

घरपोच आधार नोंदणी अद्यावत सेवेसाठी सातशे रुपये जीएसटी शुल्कासह आकारले जातील, तर त्याच पत्त्यावर दुसऱ्या व्यक्तीसाठी ३५० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. जास्त पैसे घेतल्यास त्या व्यक्तीवर कारवाई करण्याची ही निर्देश शासनाने सूचना पत्रात दिलेले आहे.

सर्व आधार केंद्रावर सुधारित दरपत्रक लावण्याबद्दल सुचित करण्यात आले आहे. आधार केंद्रावर दरपत्रक दर्शनी भागावर लावणे गरजेचं असून यात कुणी दिरंगाई केली तर त्याच्यावर नियमानुसार कारवाई होणार आहे, एवढेच नव्हे तर त्याचा परवाना देखील रद्द होऊ शकतो असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. एखाद्या नागरिकांकडून कामाचा मोबदला अतिरिक्त घेतल्या गेला तर त्यांनी थेट तक्रार द्यावी याबाबतचा पुरावा देखील सादर करावा, तर त्या केंद्र चालकावर कठोर कारवाई करता येणार आहे. असेही देशमुख यांनी सांगितले.

बदलत्या हवामानामुळे जिल्ह्यात डेंग्यू -मलेरियाचे वाढते रुग्ण



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : गेले चार दिवसापासून हवामानात झालेला बदल, ढगाळी वातावरण, आणि पावसाची रिमझिम यामुळे जीवजंतूसह डासांच्या वाढीला वेग आला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात डासाची निर्मिती होत असून त्यातूनच डेंगू, मलेरिया आणि स्क्रब टायफस, यासारखे गंभीर आजार उद्भवू लागले असल्याची माहिती डॉक्टर मडावी यांनी दिली.

गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात डेंगू आणि त्या लक्षनाशी संबंधित इतर आजारांचे रुग्ण, ग्रामीण रुग्णालय , प्राथमिक आरोग्य केंद्र, या ठिकाणी उपचारासाठी आले आहेत. त्यांच्यावर उपचार झाल्यानंतर ते प्रकृतीने ठणठणीत झाले. ऑक्टोबर महिन्यामध्ये बदलत्या वातावरणाचा परिणाम मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिकावर जाणू लागला आहे. ऑक्टोबर महिन्यात हवामानातील बदल अधिकच बाधक ठरला रात्री थंडी तर दिवसा कडक ऊन, अशा बदलांमुळे सर्दी, खोकला आणि तापाच्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली. परिणामी शासकीय आणि खाजगी रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात रुग्णांची गर्दी वाढली आहे. बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, लहान बालकांना बसत आहे. यातही ज्यांची प्रतिकारशक्ती अति कमी आहे, असे तरुण, तरुणी देखील सध्या उपचाराखाली दिसून येत आहे. खाजगी आणि शासकीय रुग्णालय यांच्यामार्फत होत असलेल्या रक्त चाचणीमध्ये ओपीडीत आलेल्या रुग्णांपैकी ७० टक्के रुग्ण हे मलेरियाचे असल्याचे दिसून येत आहे. सप्टेंबर महिन्यात देखील अशाच प्रकारचे रुग्ण मिळाले असल्याचेही डॉक्टर मडावी यांनी सांगितले.

खासगी रुग्णालयाची ओपीडी फुल

यवतमाळतील खाजगी रुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्या वाढू लागली आहे. मलेरियाच्या लक्षणासोबतच काही ठिकाणी निमोनियाचे पेशंट देखील वाढत असल्याचे सांगण्यात आले. निमोनिया झाला की रुग्णाला थेट आंतर रुग्ण विभागातच उपचारासाठी दाखल करावे लागते. हा आजार अंगावर काढला तर मृत्यूचा धोका निर्माण होऊ शकतो अशी माहिती डॉक्टर शब्बीर शेख यांनी दिली.

एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासाठी आम आदमी पार्टीचे घंटानाद आंदोलन

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : देशातील लोकशाही व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आणि मतदारांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी आमदनी पार्टीच्या वतीने जिल्हा समन्वयक मोबीन शेख यांच्या नेतृत्वात घंटानात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. एस आय आर प्रक्रिया रद्द करावी, आणि या प्रक्रिया नंतर झालेल्या निवडणुकांबाबत चौकशी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. आंदोलनाच्या प्रारंभि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला मान्यवरांनी अभिवादन केले. त्यानंतर लोकशाही संविधान आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी कार्यकर्त्यांनी घंटानाद आंदोलनाच्या माध्यमातून जनजागृती केली. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले निवेदनामध्ये एस आय आर प्रक्रिया रद्द करून ज्यांची नावे मतदार यादीतून सुटली आहेत. अशा मतदारांना समाविष्ट करावे तसेच २००२ च्या यादीत ज्यांची नावे आहेत. त्यांना मतदानाचा अधिकार द्यावा असा उल्लेख निवेदनातून केला आहे. यावेळी राज्य प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव ढोके, जिल्हा समन्वयक मोबीन शेख, प्रशांत देवकते, जिल्हा उपाध्यक्ष आकाश चमेडिया, शहर अध्यक्ष सुदाम वानखेडे, उषा श्रीरामे, प्रतीक्षा रहांगडाले, जानराव टिकले, व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

रेतीचे वाहन पकडले

यवतमाळ : आरोपीने आपल्या ताब्यातील एमएच १६/बी २९११ या क्रमांकाच्या वाहनात अवैधरित्या एक ब्रास रेती चोरट्या पद्धतीने वाहून नेताना आढळून आला. आरोपीच्या ताब्यातून पाच हजाराची रेती व चार लाखाचे वाहन असा एकूण चार लाख पाच हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २४ ऑक्टोबरला रात्री ११.१० ते ११.४० वाजता पुसद तालुक्यातील धनकेश्वर मंदिराजवळ करण्यात आली. मनोज भगवान चव्हाण (४३) असे फिर्यादी वसंतनगर पोलीस ठाण्याच्या जमादाराचे नाव आहे. तर शेख परवेज शेख इसा (२६) रा. अखसा मस्जिदजवळ, वसंतनगर, पुसद असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी वसंतनगर पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

सरकारी रुग्णालयात रुग्णसेवेचे फुल पॅकेज

लोकसूत्र प्रतिनिधी

सेवा मानके निश्चित, १३४ तपासण्यांचा मिळणार लाभ



यवतमाळ : सरकारी रुग्णालयामध्ये उपचारासाठी जाणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना आता हक्काच्या आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सरकारी रुग्णालयामध्ये रुग्णांना कोणत्या सुविधा मिळायला हव्यात, किती प्रकारच्या तपासण्या उपलब्ध असाव्यात, तसेच तज्ञ डॉक्टर आणि आवश्यक मनुष्यबळ किती असावे, याबाबतचे स्पष्ट नियम व सेवा मानके निश्चित केली आहेत. अशी माहिती शल्य चिकित्सक डॉक्टर सुखदेव राठोड यांनी दिली.

शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवेचे चित्र पालटणार असून रुग्णांना उपचारा सोबतच इतर पूरक सुविधा मिळणार आहे.

विविध स्तरावर रुग्णालयाचे वर्गीकरण आणि सुविधा कशा उपलब्ध करून द्यावयाच्या याबाबत राज्य सरकारच्या नव्या नियमामुळे ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय आणि स्त्री रुग्णालय, या प्रत्येक स्तरावर रुग्णांना कोणत्या प्रकारच्या सुविधा मिळणे अपेक्षित आहे हे अगदी स्पष्ट झाले आहे. रुग्णांना उपचाराबरोबरच प्रमाणपत्र रुग्णवाहिका, तक्रार निवारण, लसीकरण, प्रसुती आणि इतर नागरिक अभिमुख सेवा देखील तत्परने उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. निदान चाचण्याची व्याप्ती आणि उपलब्धता या संदर्भात माहिती देताना राठोड यांनी सांगितले की, प्रयोगशाळा सेवा महत्त्वाचा भाग मानला गेला आहे. नवीन मानकानुसार ग्रामीण रुग्णालयात ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात ७४ प्रकारच्या निदानात्मक चाचण्या उपलब्ध असणे, आवश्यक आहे. उपजिल्हा रुग्णालय अंतर्गत १११ प्रकारच्या चाचण्या तथा तपासण्या मिळणे गरजेचे आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच स्त्री रुग्णालय या ठिकाणी देखील १३४ सेवा मिळणे गरजेचे आहे, असे यावेळी स्पष्ट केले आहे. शासनाने ठरवून दिलेल्या माणकानुसारच सर्व ठिकाणी रुग्णाची वेळोवेळी आणि अत्यावश्यक सेवा तात्काळ देण्यासंदर्भात सुरुवातीलाच आदेश निर्गमित केलेले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालय, सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी कामाला गती प्राप्त झाली आहे. कोणताही कर्मचारी काम करताना रुग्णाप्रति आस्था घेऊन काम करतो, हे काम माझे नाही असे कोणीही म्हणत नाही, जितकी चांगली सेवा देता येईल तितकी सेवा, नियुक्त केलेला कर्मचारी देतो अशी माहिती देखील डॉक्टर सुखदेव राठोड यांनी दिली.

पान १ वरून

जिल्ह्याच्या भुजल पातळीत ...

पाणीपुरवठा विभागाने १६ सप्टेंबर २०२६ रोजी टंचाई आराखडा तयार करण्यासंदर्भात निर्णय निर्गमीत केला. तत्पूर्वी ८ एप्रिल १९९४ च्या निर्णयान्वये टंचाई अहवाल व कृती आराखडा बनविण्याचे स्थायी आदेश आहेत. भुजल अधिनियमाच्या कलम २५ द्वारे टंचाईक्षेत्र घोषित केले जात असते. त्यानुसार १३ लाख ५८४ चौकिमी भौगोलिक क्षेत्रफळाच्या १६ तालुक्यात विभागलेल्या २१६० गावातील जलसंकटाचे वास्तवच भुवैज्ञानिकांनी पुढे आणले आहे. जिल्ह्यात यंदा सप्टेंबरपर्यंत ७९८.३२ मिमी पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात ६४४.९१ मिमी पाऊस झाला. ही टक्केवारी ८०.७८ एवढी असून पावसाची ही तूट १९.२२ टक्के एवढी आहे. जिल्ह्यात सरासरीपेक्षा केवळ चार तालुक्यात जास्त पाऊस झाला. त्यात आर्णी ११.२७ टक्के, झरी १०.६५ टक्के तर नेरमध्ये केवळ २.८६ टक्के किरकोळ वाढ आहे. दारव्ह्यात ०.२७ टक्के एवढी नगण्य वाढ आहे. मात्र, जिल्ह्यात सरासरीपेक्षा १२ तालुक्यात कमी पाऊस झाला. त्यात बाभूळगाव ३६.४२ टक्के, उमरखेड ३२.९३ टक्के, यवतमाळ ३०.२२ टक्के, मारेगाव २९.६४ टक्के, राळेगाव २८.४८ टक्के, कळंब २८.४५ टक्के हे सर्वाधिक घटीचे तालुके आहेत. तर इतर तालुक्यांमध्ये वणी २५.७६ टक्के, घाटंजी २४.७६ टक्के, महागाव २३.०८ टक्के, पुसद २१.२७ टक्के, केळापूर २०.३२ टक्के तर दिग्रस ७.७४ टक्के घट आहे. जिल्ह्यात ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत ६५ गावात तर जानेवारी ते मार्च २०२७ मध्ये ७० व एप्रिल ते जून २०२७ मध्ये २८९ गावात पाणीटंचाईचा भडका उडण्याची चिन्हे आहेत.

महागावच्या लॉजवर डीवायएसपीच्या ...

या संपूर्ण प्रकरणात केवळ लॉज चालविणाऱ्यांचीच नव्हे, तर मालकाची भूमिका काय होती, याचीही सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंत्ता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजेश गाठे यांच्या मार्गदर्शनाखाली नंदकिशोर काळे यांच्या पथकाने केल्याची माहिती आहे. मात्र, कारवाईदरम्यान तब्बल दोन तासांचा विलंब झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे. या वेळेत मुख्य संबंधित व्यक्तीला नोटरी करून आणण्याची संधी देण्यात आल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. या चर्चेत कितपत तथ्य आहे, हे पोलिसांच्या अधिकृत खुलाशानंतरच स्पष्ट होणार आहे.

माजी सरन्यायाधीशांच्या हस्ते ....

महाराज्याच्या विचारांची उजळणी केली. यासह पुसदच्या नाईक परिवाराशी असलेले ऋणानुबंध विषद केले. पुसद प्रस्तावित वकील भवनाला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नाव देण्यात येईल असेही त्यांनी जाहीर केले. तसेच निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव केले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.या कार्यक्रमात न्या. अनिल किलोर यांनी मनोगत व्यक्त करुन पुसदमध्ये कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय सुरु करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. तसेच प्रस्तावित वकील भवनाची इमारत ही पायाभूत सुविधा क्षेत्रातील उत्तम उदाहरण राहील, असे प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांचे स्मृतीचिन्ह देवून स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक ॲड. आशिष देशमुख यांनी प्रस्तावित वकील भवनाची पार्श्वभूमी सांगितले. तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड भारत जाधव यांनी स्वागतपर मनोगतात पुसदमध्ये कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय सुरु करण्याची मागणी केली होती.या कोनशिला समारंभाला पुसद न्यायालयातील विधीज्ञ, अधिकारी व कर्मचारी, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

जुने वाहन खरेदी करताना नियमाचे पालन करा

त्रुटी असल्यास होणार नाही वाहन नावावर

यवतमाळ : जुने वाहन खरेदी केल्यानंतर ते आपल्या नावावर करण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली आहे. ही डिजिटल सेवा दुचाकी वाहन खरेदी करणारे आणि विकणारे या दोघांसाठीही काही प्रमाणात डोकेदुखी ठरली आहेत. एखादी त्रुटी जरी ऑनलाइन फॉर्म भरताना झाली तरी ते वाहन आपल्या नावावर होत नाही. अशा परिस्थितीत कोणतीही चूक होऊ न देणे हे एकमेव आपल्या हातात असते अशी माहिती परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांनी लोकसूत्रला दिली.

वाहनाच्या नोंदणी करिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये आरसी बुक तसेच खरेदीदाराच्या आधार कार्ड वरील नाव ,पत्ता, किंवा पिनकोड यामध्ये कोणताही फरक नसावा. आधार कार्ड वर एक पत्ता आणि आरसी बुक वर दुसरा पत्ता हे देखील यावेळी चालत नाही त्यामुळे वाहन मालक आणि खरेदीदार यांनी आपली कागदपत्र पहिल्यांदा नीटनेटकी करून घ्यावी, सर्व कागदपत्रावरील दिलेला पत्ता हा एकसारखा असेल तर कोणतीच अडचण येत नाही. जर कुठे त्रुटी राहिली तर तुमचा अर्ज प्रणालीवर स्वीकारला जात नाही परिणामी ही त्रुटी दूर करण्यासाठी नागरिकांना पुन्हा आरटीओ कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागते. म्हणून प्रत्येकानी आपली कागदपत्र सर्व व्यवहार करण्यापूर्वी सोयीचे आणि सुरळीत करून घ्यावी असेही देशमुख यांनी सांगितले. वाहन प्रणाली आणि येणाऱ्या अडचणी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाची ही राष्ट्रीय प्रणाली देशभरातील वाहन नोंदणीच्या मुख्य डेटाबेस आहे. मानवी हस्तक्षेप कमी करून पारदर्शकता आणणे हा याचा उद्देश असून सर्व राज्यांमधील आरटीओ कार्यालय या प्रणालीशी जोडलेली आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रणालीचा फटका कार आणि बाईक बाजारांमधील व्यवहारांना बसला आहे. वाहन हस्तांतरण रखडल्यामुळे खरेदी दाराचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. फायनान्स कंपन्या आणि बँका आरसी हस्तांतरणाशिवाय पुढील कर्ज प्रक्रिया पूर्ण करीत नाहीत आणि विम्याचा दावा मिळण्याची अडचण निर्माण होते.

राजेंद्र गुळकरी, वाहन एजंट,यवतमाळ.

मलकापुरात लाखोंची घरफोडी

सोन्याचांदीचे दागिने लांबविले

महागाव पोलिसांचा वचक संपुष्टात

यवतमाळ : महागाव पोलिसांच्या कार्यक्षेत्रात अवैध धंद्यांसह चोऱ्या व घरफोडीच्या गुन्ह्यांचा आलेख वाढला आहे. अनैतिक व्यवसायालाही काही हॉटेल व ढाब्याच्या आडून प्रोत्साहन मिळत आहे. त्यातच २९ व ३० सप्टेंबरच्या दरम्यान मलकापूर चिखली येथे लाखोंची घरफोडी झाली. यामध्ये तब्बल नऊ लाख ३७ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला आहे.

सुनिल किसन आसोले (४२) रा. मलकापूर चिखली असे फिर्यादीचे तर रामहरी दिवाकर भोयर (३०) रा. मलकापूर चिखली असे संशयिताचे नाव आहे. आरोपीने फिर्यादीच्या घराचा कुलूपकोंडा तोडून आत प्रवेश केला. अलमारीतील रोख चार लाख ८० हजार रुपये, १२ ग्रॅमची एक लाख ५६ हजार ४८० रुपयांची सोन्याची पोत, गहू मण्यांची ८० मणी असलेली एक लाख ३० हजार ४०० रुपयांची १० ग्रॅमची पोत, त्यामध्ये ६५ हजार २०० रुपयांचे पाच ग्रॅमचे सोन्याचे लॉकेट, ८४ हजार रुपये किमतीचे ४० तोळे वजनाचे चांदीचे दंडकडे, २१ हजारांचे १० तोळ्यांचे लहान मुलाचे चांदीचे वाळे असा एकूण नऊ लाख ३७ हजार ८० रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी महागाव पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

महायुतीत अंतर्गत ओढाताण, आज होणार अध्यक्षपदाचा निर्णय, आघाडीकडूनही नवे डावपेच

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून धुसफूस

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीवरून सत्ताधारी महायुतीत पडद्यामागे तीव्र राजकीय घडामोडी सुरू आहेत. महायुतीने बँकेच्या निवडणुकीत २५ पैकी १६ जागांवर स्पष्ट बहुमत मिळवले. त्यामुळे अध्यक्षपद महायुतीकडेच जाणे निश्चित मानले जात आहे. मात्र, अध्यक्षपदासाठी महायुतीतील दोन संजयमध्ये रस्सीखेच वाढल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यातच या निवडीमागे आता जात फॅक्टरही निर्णायक ठरण्याची चिन्हे उभी झाले आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक महायुतीसह महाविकास आघाडीने प्रतिष्ठेची केली होती. २५ संचालक मंडळांच्या जागेसाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने तब्बल १६ जागा जिंकल्या, तर आठ जागा आघाडीने व एक जागा अपक्षाला गेली. मात्र, अध्यक्षपदावरून युतीत ओढाताण सुरू झाली आहे. त्यात मित्रपक्ष राष्ट्रवादीनेही सहा जागा जिंकल्या असून, तीन जागा भाजपाने जिंकल्या आहेत. त्यामुळे शिंदे सेनेचे सात संचालक आहेत. महायुतीत वरवर ऑलवेल दिसत असले तरी अलीकडेच वर्षभरापूर्वी शिंदे सेनेत दाखल झालेले खा. संजय देशमुख या बँकेत बिनविरोध निवडून आले. त्यामुळे अध्यक्षपदावर त्यांचा दावा आहे. त्यातूनच जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड आणि खा. देशमुख यांच्यात वर्चस्वावरून मोठी ओढाताण सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दोघेही एकाच पक्षात (शिंदे सेनेत) असले, तरी जिल्हा बँकेच्या माध्यमातून स्वतःचे राजकीय प्रस्थ निर्माण करण्यासाठी दोघांचेही गुप्त डावपेच सुरू असल्याचे बोलले जात आहे. मंत्री राठोड यांचे खंदे समर्थक संचालक राजूदास जाधवांचे नाव अध्यक्षपदासाठी रेटले जात आहे. मात्र, संजय देशमुखांची दावेदारी मजबूत मानली जात आहे. त्यामागे बँकेतील जातीय समीकरण आणि सामाजिक संख्याबळाचा मुद्दा पुढे आल्याने राजकीय समिकरणात मोठा बदल होण्याची चिन्हे आहेत. या नव्या समीकरणांमुळे खा. संजय देशमुख यांच्या नावाची दावेदारी अत्यंत मजबूत होत असल्याचे बोलले जात आहे.

१ नोव्हेंबरच्या बैठकीकडे लक्ष

शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या धामधुमीमुळे आणि नेते परदेशात असल्यामुळे चर्चेला हवा तसा वेग मिळालेला नव्हता. आता १ नोव्हेंबर रोजी महायुतीच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार असून, याच बैठकीत उमेदवाराच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब होईल.

राष्ट्रवादीचा दावा अन् महाविकास आघाडीची नजर!

एकडे महायुतीकडे १६ बळकट संचालक असतानाही, राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ संचालक निवडून आल्याने त्यांनीही अध्यक्षपदावर आपला प्रबळ दावा ठोकला आहे. निवडणुकीपूर्वी पुसद व दिग्रस तालुका गटातील जागा महायुतीने बिनविरोध जिंकल्या होत्या.दुसरीकडे, विरोधी महाविकास आघाडीकडे ८ जागांचे संख्याबळ असल्याने, महायुतीतील या अंतर्गत कुरघोडी आणि भांडणाचा फायदा उठवत कुणाला ऐनवेळी साथ देऊन सत्तेत भागीदार होता येईल का, याची संधी साधण्यासाठी आघाडीचे नेतेही आपली राजकीय गणिते मांडत आहेत.

अध्यक्षपदाच्या मार्गात कायदेशीर पेच!

संजय देशमुख यांच्या नावावर चर्चा झडत असतानाच त्यांच्या अध्यक्षपदाच्या पात्रतेबाबत एक कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. सहकारी बँकांमधील संचालकांच्या पात्रतेसंदर्भात बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदी आणि न्यायालयाचे यापूर्वीचे निर्णय अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या व्यक्तीच्या पात्रतेचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला असून, संजय देशमुख यांची निवड झाली तरी कायदेशीर तरतुदीनुसार त्यांचा कार्यकाळ किती राहील, याबाबत उत्सुकता आहे.

११४३ गावांत १६ हजार ६४१ उपाययोजना

खनिजसह डीपीसी व अन्य योजनातून तरतूद

दुष्काळासाठी जलसंधारणचा १०१ कोटींचा आराखडा

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांमध्ये जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय मृद व जलसंधारण विभागाने २६ ऑक्टोबरच्या शासन निर्णयान्वये घेतला. सेवासंकल्प व जलसंधारण अभियानाच्या कालावधीत जिल्ह्यात दशसूत्री कार्यक्रम राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. प्रामुख्याने त्या आधारावर जिल्ह्यात उपाययोजनांचा एकत्रिक तब्बल १०१ कोटी ८५ लाखांचा आराखडा बनविला आहे. जिल्ह्यातील एक हजार १४३ गावात १६ हजार ६४१ उपाययोजना केल्या जाणार आहेत.

अल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण कामाच्या समन्वयासाठी ८ मे रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स गठीत झाले. त्याद्वारे २५ मे व २२ जुलै रोजी पार पडलेल्या बैठकीत निर्देश दिले गेले. राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून उपाययोजना व सवलती लागू झाल्या. दशसूत्री कार्यक्रमामध्ये जलसंधारण कामांचा समावेश केला. प्रामुख्याने बंधाऱ्यांचे बळकटीकरण, शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य क्रेदांची देखभालदुरूस्ती, शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा, झेडपीच्या शाळांसह अंगणवाडी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय महाविद्यालयातील मुलभूत सुविधांची देखभाल व दुरूस्ती, वैरण विकास योजनांअंतर्गतची कामे, कृषी व कृषीसंलग्न कामे, विद्युतीकरणासह स्मशानभूमी दुरूस्तीची कामे, पेयजल टंचाईमध्ये विहिरी खोल करणे, गाळ काढणे, विहिरींचे अधिग्रहण, नळ योजनांची विशेष दुरूस्ती, विंधन विहिरी, तात्पुरत्या पूरक नळयोजना, टँकरने पाणीपुरवठा अशा कामांचा समावेश आहे. प्रामुख्याने जलसंधारण विभागाने २०१५ ते २०२६ पर्यंतची टँकरग्रस्त गावे उपाययोजनेसाठी निवडली. ज्या गावातील पाणीपातळी ३ मीटरने खोल गेली आहे अशा गावांसह टंचाई आराखड्यातील गावे,नाला खोलीकरण झालेल्या गावांमध्ये रिचार्ज शॉफ्ट अशा प्रकारच्या उपाययोजनांचा हा आराखडा आहे.

प्रस्तावीत कामांचा तपशील

निधी	गावे	कामे	रक्कम (लक्ष)
जिल्हा खनिज निधी	२२	४७६	२७०.६८
जिल्हा वार्षिक योजना	१३१	३५४३	२२५१.८४
टंचाई आराखडा	२५७	४१२	२५७०
नाविन्यपूर्ण योजना	४२७	६११	१५२.७५
विभागाचा स्वनिधी	३०६	७८९९	४९४०.४८
एकूण	**११४३**	**१६६४१**	**१०१८५.७५**

ट्रॅव्हल्सचालकाकडून सुप्रो वाहनाच्या चालकास मारहाण

यवतमाळ : भरधाव वेगातील ट्रॅव्हल्सने दुसऱ्या एका चारचाकीला मागून कट मारला. त्यानंतर ट्रॅव्हल्सचालक भरधाव निघाला. दरम्यान चारचाकी चालकाने पाठलाग करून ट्रॅव्हल्सचालकाला कट का मारला असा जाब विचारला. त्यावरून ट्रॅव्हल्सचालकाने वाहनातून लोखंडी टॉमी काढून डोक्यावर मारत जखमी केले. ही घटना ३० ऑक्टोबरला सकाळी ११.३० वाजता सोनखास येथे घडली. उमेश राघोजी अरगडे (२८) रा. सोनखास असे फिर्यादी चारचाकी चालकाचे नाव आहे. तर एमएच २९/बीई १४१६ या क्रमांकाच्या ट्रॅव्हल्सचा चालक असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. फिर्यादी उमेश हा त्याची एमएच २९/बीसी ४३६८ या क्रमांकाची सुप्रो चारचाकी घेऊन मोहदा येथून काही प्रवासी घेत यवतमाळकडे निघाला होता. पार्डी गावाजवळ आरोपी ट्रॅव्हल्सच्या चालकाने वणीवरून यवतमाळकडे येत असताना त्याचे वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या चारचाकीला मागून जोरात कट मारत निघून गेला. त्यामुळे फिर्यादीने ट्रॅव्हल्स थांबविण्याकरिता पाठलाग केला असता सोनखास येथे ट्रॅव्हल्स थांबविली. फिर्यादी उमेशने ट्रॅव्हल्सचालकाला तू माझ्या वाहनाला कट का मारला, असा जाब विचारला असता ट्रॅव्हल्सचालकाने वाद घालून लोखंडी रॉड काढत उमेशच्या डोक्यावर मारला. यात उमेश जखमी झाला. तक्रारीवरून या प्रकरणी यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

बाभूळगाव पंचायत समितीत अनागोंदी

ग्रामपंचायतींमध्ये अपहारांची उड्डाणे

ग्रामविकासाचा परफॉर्मन्स राखण्यात बीडीओ फेल

शेख दानिश

बाभूळगाव : ग्राम विकास विभागाच्या असंख्य योजना ग्रामपंचायतीच्या उत्कर्षाचा मार्ग आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामपंचायतींना आर्थिक स्वायत्तता दिली. मात्र, बाभूळगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये १५ व्या वित्त आयोगासह इतरही लेखाशिर्षाखालील योजनांमध्ये आर्थिक अनागोंदीने कळस गाठला आहे. ग्रामविकासाचा परफॉर्मन्स राखण्यात बीडीओंसह विस्तार अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची यंत्रणा फेल ठरली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या विकासावर भर दिला जातो. प्रामुख्याने राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविले जाते. गावातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ मिळावा, हा योजनेचा हेतू आहे. बाभूळगाव तालुक्यात जलसंपन्न, स्वच्छ आणि हिरवेगार गाव एकही तयार झाल्याचे उदारहरण नाही. त्याचबरोबर राष्ट्रीय बायोगॅस आणि सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम राबविला जातो. लोकप्रतिनिधींनी सुचविल्याप्रमाणे ग्रामीण भागातील गावांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी २५:१५, १२:३८ शिर्षाअंतर्गत कामे केली जातात. दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, स्वामित्त्व योजना, प्रधानमंत्री आवास योजना, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अशा योजना राबविल्या जातात. मात्र, बाभूळगाव तालुक्यात घरकूल योजनांचा परफॉर्मन्स अत्यंत नगण्य आहे. प्रधानमंत्री आवास, रमाई आवास अशा योजनांची स्थिती गंभीर आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नवाढीची योजना कुठेही दिसत नाही. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत ग्रामीण भागात १०० टक्के शौचालयांचा वापर अनिवार्य आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कार्यक्रमात बाभूळगाव तालुक्याची स्थिती उत्तम दिसत नाही. पंचमहाभूतांवर आधारीत जसे, पृथ्वी, जल, वायू, अग्नी, आकाश यावर आधारीत शाश्वत विकासाचा उपक्रम म्हणून माजी वसुंधरा अभियान राबविले जाते. मात्र, त्याकडेही बीडीओंचे लक्ष नाही.

महिला व सामाजिक कल्याणाच्या योजना अपयशी

ग्रामीण भागात महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अर्थात उमेद अभियानांतर्गत बचतगटांच्या माध्यमातून महिलांना शाश्वत स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाते. महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून महिला व बालकांचे आरोग्य, पोषण आहार तसेच साहित्याचेही वाटप केले जाते. मात्र, बाभूळगाव तालुक्यात योजनांची स्थिती गंभीर आहे.

वित्त आयोगाच्या योजनेत अनागोंदी

गत कालखंडात १५ व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतींनी अनेक कामे घेतलीत. जलशुद्धीकरण यंत्रासह अन्य केलेल्या कामांचा दर्जा अत्यंत सुमार आहे. त्यामुळे या कामांची चौकशी होणे अनिवार्य आहे. दरवर्षी स्थानिक लेखा विभागाकडून ऑडिट केले जाते. त्यामध्येही ग्रामपंचायतीतील आर्थिक अपहाराचे आकडे मोठे आहेत.

दौरा दैनंदिनीकडेच अधिकाऱ्यांची पाठ


बीडीओंसह सर्व विस्तार अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये दौरे व मुक्काम करणे अनिवार्य आहे. बाभूळगाव तालुक्यात ग्रामपंचायतींची दप्तरतपासणीच हे अधिकारी करताना आढळत नाहीत. अनेक अधिकारी अपडाऊन करतात. मुख्यालयीसुद्धा राहत नाहीत. त्यामुळे झेडपी सीईओंनी बाभूळगाव पंचायत समितीला व्हीजिट देणे अनिवार्य झाले आहे.

उमरी-खेड-लाखखिंड रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह, तांत्रिक व आर्थिक मापदंडांना फाटा, गुणनियंत्रण चौकशीची मागणी

कोटींच्या रस्ते बांधकामात 'गौडबंगाल'?

प्रवीण राऊत

दारव्हा : तालुक्यातील मौजा उमरी (ई) ते खेड आणि लाखखिंड या रस्त्याच्या बांधकामात तांत्रिक व आर्थिक मापदंडांना फाटा दिला जात आहे. जिल्हा नियोजन व जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २, अंतर्गतच्या निधीतून सुरू असलेल्या या कामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप होत आहे. कोट्यवधींच्या रस्तेकामात गुणवत्तेचे निकष पायदळी तुडवले जात असल्याचा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. संबंधित कामाचे करारनामे १७ जानेवारी २०२४ दरम्यान केल्याची माहिती आहे. या कामाचे कंत्राट वेगवेगळ्या ठेकेदारांकडे विभागून दिल्याचीही माहिती आहे. कंत्राटदारांनी गिट्टी न उकरताच रस्ता बांधकाम चालविले. तक्रारीनुसार, काही ठिकाणी जुन्या रस्त्यावरील गिट्टी न उकरता त्यावरच नवीन गिट्टी टाकून रस्त्याचे काम पूर्ण दाखविले आहे. त्यामुळे हे बांधकाम दर्जेदार आहे की केवळ वरवरची डागडुजी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मुरुमाऐवजी लाल मातीचा वापर?

रस्त्याच्या साइडपट्ट्यांवर मुरुमाऐवजी लाल मातीचा वापर केल्याचा आरोप आहे. ज्या ठिकाणी मुरुमाचा वापर केला, त्या मुरुमाची रॉयल्टी भरली आहे का, गौण खनिज वाहतुकीचे नियम पाळले का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे. उमरी येथील काँक्रीट रस्त्याच्या रुंदीबाबतही आक्षेप घेण्यात आला आहे.

अभियंत्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

एवढे गंभीर आरोप होत असताना संबंधित अभियंते, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आणि गुणवत्ता तपासणी यंत्रणा नेमकी काय करीत आहे, असा सवाल आहे. प्रत्यक्ष कामाची पाहणी झाली आहे का? मोजमाप पुस्तिकेत (एमबी) नोंदी कशा करण्यात आल्या? ठेकेदाराला देयके अदा करताना गुणवत्तेची तपासणी झाली का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

थेट जिल्हाधिकाऱ्यांसह आयुक्तांकडे धाव

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी राष्ट्रव्यापी मातृभूमी भेदभाव निर्मूलन समितीचे अध्यक्ष भीमराव राठोड यांनी दारव्हा एसडीओंसह जिल्हाधिकारी व आयुक्तांकडेही लेखी तक्रार केली आहे.

या बाबींची तपासणी अनिवार्य

या रस्त्याच्या कामाचे तांत्रिक ऑडिट, प्रत्यक्ष स्थळपाहणी, साहित्याची गुणवत्ता तपासणी, मोजमाप पुस्तिकेची पडताळणी, रॉयल्टीच्या पावत्यांची तपासणी आणि ठेकेदारांना अदा केलेल्या देयकांची चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com